# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

---

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/ ४/२०१४-१५/५७ दिनांक : ३०.०५.२०१४

**आदेश केस क्र.४/१४-१५**

श्री. बाळासाहेब नारायण महाडीक,
मु.पो.निगडी खुर्द, ता.जत,
जि.सांगली.

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, सांगली.

२) कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठेमहांकाळ.

३) उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभागीय कार्यालय, संख.

विरुध्द पक्षकार

**कोरमः-** १. श्री.बी.जी.पवार,अध्यक्ष
२. श्री.जी.सी.लेले,सदस्य

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**
**(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)**
**विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार**

**न्याय निर्णय**

श्री.बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री.बाळासाहेब नारायण महाडीक, मु.पो.निगडी खुर्द, यांनी गट क्र.६८१/२ मध्ये शेतीपंप नवीन वीज कनेक्शनसाठी दि.०६.१०.२०११ रोजी चलन रु.४०५०/- पावती क्र.०२०९३५२ नुसार भरले आहेत. कृती मानके विनियमानुसार वितरण वाहिनीचा विस्तार असल्याने तीन महिन्यात म्हणजे दि.०५.०१.२०१२ पर्यंत वीजजोडणी मिळावयास हवी. वितरण कंपनी अशी वीज जोडणी देत नाही. अंतर्गत कक्ष,सांगली, यांचेकडे तक्रार क्र.२९७ दि.२४.०१.२०१४ रोजी दाखल केली. त्याच्या नाराजीने प्रस्तुत अपील दि.०७.०४.२०१४ रोजी मंचाकडे उपविभागीय कार्यालय,संख व विभागीय कार्यालय,कवठेमहांकाळ, यांचेविरुध्द दाखल केले. मंचाकडून अपेक्षित मदत - CGRF Regulation Section ८.२ नुसार मंचास गा-हाणे ठराविक कालावधीत दूर करण्याचे अधिकारआहेत. म्हणून तात्काळ वीजपुरवठा करण्याचे आदेश व्हावेत. विलंबापोटी भरपाई मागण्याची परवानगी मिळावी. कारण कृती मानके विनियमानुसार वीजपुरवठा देणेस निश्चित कालावधी नेमस्त केला आहे. कृती मानके विनियमानुसार जेष्ठताक्रमांकाप्रमाणे वीजपुरवठा करणेत यावा हे म्हणणे समजून येत नाही.

वितरण कंपनीने आपल्या लेखी अहवालात ग्राहकाने चलनाचे पैसे भरल्याचे मान्य केले. सदरच्या कनेक्शनसाठी ०.१८ किमी. लघुदाबवाहिनी उभी करावी लागत असल्याने ग्राहकाचा जेष्ठतायादीप्रमाणे ८७ वा असून प्रलंबित ग्राहकाची संख्या ३९९ आहे. सन २०११-२०१२ वर्षातील सदरचे काम करण्यासाठी कार्यकत्रांटी आदेश देण्यात आले आहेत.

प्रस्तुत तक्रारीची सुनावणी मंचासमोर आज दि.२६.०५.२०१४ रोजी झाली. तक्रारदार गैरहजर व प्रतिनिधी श्री.खापरे उपस्थित नाही. वितरण कंपनीतर्फे श्री.पाटील उपस्थित. त्यांनी मंजुरीनंतर कालव्यामुळे काम प्रलंबित राहिले असे सांगण्याचा प्रयत्न केला. कालव्यामुळे ग्राहकास सांगोला हद्दीतून कंपनीतर्फे वीजजोडणी देण्याचे प्रयत्न केले जातील असे सांगितले.

खालील मुद्दा न्यायनिर्णयासाठी मंचाकडे  उपस्थित होतो.

**मुद्दा क्र.१:** ग्राहकाने मागणी केलेप्रमाणे तात्काळ वीजपुरवठा द्यावा असे आदेश देणे योग्य व कायदेशीर होईल काय ?

**उत्तर :** नाही.

**मुद्दा क्र.२:** आदेश.

**उत्तर:** अंतिम आदेशाप्रमाणे.

## कारणमिमांसा

उभय बाजुच्या लेखी कथनानुसार ग्राहकाने ऑक्टोबर,२०११ मध्ये चलनाचे पैसे भरुन वीज जोडणीची मागणी केली आहे. सदर कामासाठी ०.१८ किमी. लघुदाबवाहिनी उभी करावी लागत असल्याने सन २०११-१२ मधील प्रलंबित ग्राहकांची कामे करण्यासाठी कार्यकत्रांटी आदेश देण्यात आले आहेत. मंचासमोर वितरण कंपनीच्या अधिका-यांनी सांगितल्याप्रमाणे उपकालव्यापलीकडे सांगोला गावाची हद्द लागतअसल्याने कंपनीच्या सांगोला येथील वीजजोड वाहिनीमधून वीज देण्यात येईल. हे खरे की लघुदाबवाहिनीचा विस्तार असल्याने कृती मानकानुसार ग्राहकास तीन महिन्यात वीजजोडणी मिळणे अपेक्षित आहे. त्यात अपयश आल्यास ग्राहक विलंबापोटी भरपाई मागु शकतो. ग्राहकाने गा-हाणे दूर झाल्यास विलंब निश्चित झाल्यानंतर भरपाई मागण्याची परवानगी मागितली आहे. ती मंजुर करणे योग्य होईल असे मंचाचे मत झाले आहे. सन २०११-२०१२ मधील प्रीपेड ग्राहकांची यादी एकूण ३९९ असून त्यात ग्राहकाचा क्र.८७ आहे. पुरवठा अधिनियम २००५ मधील कलम ४.४ नुसार वितरण कंपनीवर शक्यतो ग्राहकास **"first come, first served"** आधारे वीजपुरवठा करणेचे बंधन आहे. अशा परिस्थितीत CGRF २००६ मधील कलम ८.२ नुसार ठराविक मुदतीत गा-हाणे दूर करणेचे आदेश देण्यासारखी परिस्थिती या केसमध्ये नाही. तसा आदेश देणे मंचाचे मते योग्य व कायदेशीर नाही. त्यामुळे मुद्दा क्र.१ चे उत्तर **नाही** असे देण्यात येते.

## आदेश

१. तक्रारदाराची तात्काळ वीजपुरवठा देण्याच्या आदेशाची मागणी फेटाळण्यात येत आहे.

२. विद्युत वितरण कंपनीने जेष्ठताक्रमांकानुसार वीजपुरवठा देऊन तसा अहवाल मंचास द्यावा. ग्राहक विलंबापोटी भरपाई वितरण कंपनीविरुध्द स्वतंत्ररित्या मागु शकतो.

३. सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४. या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ३०.०५.२०१४

सही/-
(बी.जी.पवार)
अध्यक्ष

श्री.जी.सी.लेले, ग्राहक सदस्य .. सही/-

बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

सही/-
(बी.जी.पवार)
अध्यक्ष